# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

डॉ. संगमेश्वर निला (समन्वयक)

- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात सन २०१९—२० मध्ये प्रवेशाकरिता प्रवेश पूर्व परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये ३०० विद्यार्थी सहभागी झाले. सन २०१९—२० मध्ये वरिष्ठ विभागात ९५ विद्यार्थी तर कनिष्ठ विभागात ५४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

प्रा. संदीप चेंडकापूरे (सह—समन्वयक)

- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वार्षिक उपक्रमाचे उद्‌घाटन दि.८जुलै २०१९रोजी दै. दिव्य मराठीचे उप.संपादक तसेच स्वामी विवेकानंद केंद्राचे समन्वयक श्री सिध्दाराम पाटील यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी पाटील यांनी 'स्वामी विवेकानंद व स्पर्धात्मक युगातील युवक' या विषयावर व्याख्यान दिले.

- 'स्पर्धा परीक्षा नियोजन व आव्हाने' या विषयावर दि. १३ जुलै २०१९ रोजी सोलापूर व इचलकरंजीचे सहा.कामगार आयुक्त मा. श्री. निलेश येलगुंडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी त्यांनी 'स्पर्धा परीक्षेची तयारी करताना आपली अंगभूत कला व कौशल्य विकसित केले पाहिजे' असे मार्गदर्शन केले.

- एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी. इत्यादि परीक्षांद्वारे होणाऱ्या भरती प्रक्रियेच्या तयारीच्या अनुषंगाने दि. ८ ऑगस्ट २०२९ रोजी स्पर्धा परीक्षा एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत डॉ. संगमेश्वर निला यांनी यु.पी.एस.सी. परीक्षा तयारी कशी करावी, अभ्यासक्रम व परीक्षा पध्दतीवर मार्गदर्शन केले. हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालयातील डॉ. नवराज काळदाते यांनी एम.पी.एस.सी. या परीक्षा नियोजन वर मार्गदर्शन केले. तसेच हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालयाचे डॉ. शिवकुमार बिराजदार यांनी बॅकींग क्षेत्रातील परीक्षेची तयारी कशी करावी या विषयावर मार्गदर्शन केले याप्रसंगी विविध महाविद्यालयातील २५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

- यू.पी.एस.सी. तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केंद्रिय परीक्षेला सामोरे जाताना कोणते पूर्व नियोजन आवश्यक आहे. या अनुषंगाने यु.पी.एस.सी. परीक्षेचा अनुभव असलेले श्री. जिलानी आगासपूरे यांचे मार्गदर्शन झाले.

- एम.पी.एस.सी., पी.एस.आय. व रेल्वे परीक्षेच्या तयारी करिता दि. ५ सप्टेंबर २०१९ व ११ सप्टेंबर २०१९ रोजी श्री. श्रीहरी माने यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

- सोलापूर सोशल फांउडेशन (लोकमंगल संचलित) व वालचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२८ सप्टेंबर २०१९ रोजी यु.पी.एस.सी. कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. डिग्री कॉलेज ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन सर्व्हिसेस चे माजी प्राचार्य व जय ॲकॅडमी चे संचालक श्री असिफ यत्नाळ यांनी 'यू.पी.एस.सी. स्ट्रक्चर' संबंधी मार्गदर्शन केले.

◆ बॅकीग क्षेत्रात व स्टाफ सिलेक्शन या परीक्षांद्वारे होणाऱ्या भरतीच्या अनुषंगाने स्टेट बॅक ऑफ इंडियाचे निवृत्त मॅनेजर श्री कैलास राजमान्य यांचे 'बॅकीग क्षेत्रातील करीयरच्या संधी' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

◆ महाराष्ट्र शासनाच्या महा वॉकॅथॉन योजनेनुसार दि. ३० नोव्हेंबर २०१९ रोजी रस्ते वाहतूक सुरक्षा सुरक्षित वाहन चालवणे व जनजागृतीसाठी महा वॉकॅथॉन २०१९ प्रबोधन रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी केले. उप.प्रादेशिक परिवहन अधिकारी मा.श्री. संजय डोळे यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा हेल्मेट वापरणे, नशा न करता वाहन चालवणे या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास परिवहन कर्यालयाचे अधिकारी श्री. टी.एस. धुमाळ, श्री. आर.बी. कळमणकर, श्री. अ.भि.खेनट, श्री.अजित ताम्हणकर, श्री. संजय मोरे, श्री. माधव सूर्यवंशी इत्यादि अधिकारी व सहा. मोटार वाहन निरीक्षक उपस्थित होते. रॅलीमध्ये २५० विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते.

◆ शारदाबाई पवार महिला, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज, बारामती यांनी आयोजित केलेल्या 'स्वयंसिध्द युवती संमेलन' दि २६ ते २९ डिसेंबर २०१९ दरम्यान Student Exchange programme for the Empowerment of Girl Student अंतर्गत आपल्या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या कु. पद्मजा मोरे, कु. दिव्या धुते, कु. कविता नारंगी, कु. पल्लवी तानवडे व जैव तंत्रज्ञान विभागातील ५ विद्यार्थींनी सहभागी झाल्या. डॉ. सौ. वैशाली गरगडे यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.

◆ दि. ०८ जानेवारी २०२० रोजी सोलापूरचे जी.एस.टी. ऑफिसर मा. सौ. वृषाली मेहता यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करताना 'वेळेचे नियोजन' या विषयी मार्गदर्शन केले.

◆ एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी., रेल्वे, बॅक, स्टाफसिलेक्शन इत्यादि परीक्षांद्वारे होणाऱ्या भरती प्रक्रियेच्या तयारीच्या अनुषंगाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सोलापूर महानगरपालिकेचे मुख्य लेखापाल मा. अजयसिंह पवार यांनी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक, डॉ. वसंत कोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी युनिक अॅकॅडमी, पुणे चे संचालक मा.श्री.परशुराम शिंदे यांनी 'स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना एम.पी.एस.सी. ची तयारी' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात श्री. रणवीर केसरी यांनी रेल्वे ग्रुप डी व सी तसेच केंद्रिय सेवा व स्टाफसिलेक्शन द्वारे घेण्यात येणाऱ्या परीक्षा पध्दती विषयी मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात स्टडी सर्कलचे संचालक मा. सतीष मोरे यांनी 'मुलाखतीचे तंत्र व व्यक्तिमत्व चाचणी' या विषयावर मार्गदर्शन केले. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष मा. प्राचार्य संतोष कोटी हे होते. समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सत्यजित शहा हे होते. कार्यशाळेत सोलापूर शहर व जिल्ह्यातून २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केंद्राचे सह–समन्वयक

प्रा. संदीप चेंडकापूरे, संदेश बोराळकर, डॉ. चंद्रकांत चव्हाण, डॉ. महावीर शास्त्री, डॉ. नागनाथ धायगुडे यांनी नियोजन समितीच्या माध्यमातून उत्कृष्ट सहकार्य केले.

- औद्योगिक क्रांती गणितज्ञ रामानुजन यांच्या वरील माहितीपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला व त्यावरील प्रश्नोत्तरांची चर्चा झाली. यामध्ये कनिष्ठ विभागातील ५४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.
- श्रीकांत कुलकर्णी (एस.टी.आय.) यांनी विविध सत्रांतून मार्गदर्शन केले.
- भूगोल दिनानिमित्त सोलापूर शहरातील हवामान विभागाच्या वेधशाळेला विद्यांर्थ्यांची अभ्यासभेट संपन्न झाली.
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने वर्ष भरात झालेल्या विविध उपक्रमात प्रा. चेतन तुपकर, डॉ. नवराज काळदाते, डॉ. शिवकुमार बिरादार,डॉ. एम.आर. आसबे, डॉ. व्ही.टी. वडेर, डॉ. गोविंद तोडकरी, डॉ. धानेश लिगाडे, डॉ. ज्योति वाघमारे, डॉ. भागवत गजधाने, प्रा. परमेश्वर कमळे, डॉ. नानासाहेब गव्हाणे, प्रा. बी.एम. स्वामी, प्रा. एस.एस.शिंदे, डॉ. पी.डी. माळी, अॅड. नागेश पाटील, यांनी विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- गंथ्रपाल सौ. वंदना गवळी यांनी विद्यार्थ्यांना ५० सवलतीच्या दरात पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी पुस्तक स्ऑल व प्रदर्शनाचे आयोजन केले त्यासाठी श्री राजकुमार कस्तुरकर यांनी विशेष परिश्रम घेतले.